कार्य.७०

भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# भारतीय बॉयलर अधिनियम, १९२३

(१९२३ चा अधिनियम क्रमांक ५)

[१ ऑक्टोबर, १९७८ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Indian Boilers Act, 1923

## (Act No. 5 of 1923)

[ As in force on the 1st October, 1978 ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासनानी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९७९

मत—६० पैसे ]

# भारतीय बॉयलर अधिनियम, १९२३

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.
२क. भरणनळयांना अधिनियम लागू असणे.
२ख. बचतसाधकांना अधिनियम लागू असणे.
३. लागू होण्याची मर्यादा.
४. विस्तार मर्यादित करण्याची शक्ती.
५. मुख्य निरीक्षक, उप मुख्य निरीक्षक व निरीक्षक.
६. नोंदणी न झालेल्या किंवा प्रमाणपत्र न मिळालेल्या बॉयलरच्या वापराला मनाई.
७. नोंदणी.
८. प्रमाणपत्राचे नूतनीकरण.
९. तात्पुरते आदेश.
१०. प्रमाणपत्र मंजूर करण्यात येईपर्यंत बॉयलरचा वापर.
११. प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश रद्द करणे.
१२. बॉयलरांमध्ये फेरबदल करणे व त्यांचे नवीकरण करणे.
१३. वाफनळयांमध्ये फेरबदल करणे व त्यांचे नवीकरण करणे.
१४. तपासणीच्या वेळी मालकाचे कर्तव्य.
१५. प्रमाणपत्रे, इत्यादी हजर करणे.
१६. प्रमाणपत्रे, इत्यादींचे हस्तांतरण.
१७. प्रवेश करण्याची शक्ती.
१८. अपघाताचा अहवाल.
१९. मुख्य निरीक्षकाकडे अपिले.
२०. अपील प्राधिकरणाकडे अपिले.
२०क. अपील प्राधिकरणाच्या आदेशांचे पुनरीक्षण करण्याची केंद्र शासनाची शक्ती.
२१. आदेशांची अंतिमता.
२२. किरकोळ दंड.
२३. बॉयलरच्या बेकायदेशीर वापराबद्दल दंड.
२४. इतर दंड.
२५. नोंदणी चिन्हामध्ये गैरफेर करण्याबद्दल दंड.
२६. खटल्यांची मुदत आणि त्यांना पूर्वमंजुरी.
२७. गुन्ह्याचो संपरीक्षा.
२७क. केंद्रीय बॉयलर मंडळ.
२८. विनियम करण्याचो शक्ती.
२८क. केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.
२९. नियम करण्याची शक्ती.
३०. नियमभंगाबद्दल दंड.
३१. विनियम व नियम यांचे प्रकाशन.
३१क. निदेश देण्याची केंद्र शासनाची शक्ती.
३२. फी, इत्यादींची वसुली.
३३. शासनाला लागू असणे.
३४. सूट.
३५. [ निरसित. ]
अनुसूची-[ निरसित. ]

# भारतीय बॉयलर अधिनियम, १९२३

## (१९२३ चा अधिनियम क्रमांक ५)[१]

[ २३ फेब्रुवारी, १९२३ ]

**वाफजनक बॉयलरांशी संबंधित असलेला कायदा एकत्रित व विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, वाफजनक बॉयलरांशी संबंधित असलेला कायदा एकत्रित व विशोधित करणे समयोचित आहे; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास 'भारतीय बॉयलर अधिनियम, १९२३' असे म्हणता येईल.

[२][ (२) त्याचा विस्तार [३][जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून] संपूर्ण भारतभर आहे.]

(३) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [४]दिनांकास तो अंमलात येईल.

**व्याख्या.**

२. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर, —

(क्) "अपघात" याचा अर्थ, बॉयलरचा किंवा वाफनळीचा स्फोट होणे अथवा जेणेकरून बॉयलरचा किंवा वाफनळीचा स्फोट होऊ शकेल इतपत त्याची शक्ती कमी होईल अशाप्रकारे त्याला कोणतेही नुकसान पोचणे असा आहे;

[५][ (क्क्) "मंडळ" याचा अर्थ, कलम २७क खाली घटित केलेले 'केंद्रीय बॉयलर मंडळ' असा आहे;]

(ख्) "बॉयलर" याचा अर्थ, जे पात्र [६]* * * * दाबाखाली वाफेची निर्मिती करण्यासाठीच खास वापरले जाते असे [७][२२.७५ लिटर] हून जास्त क्षमतेचे कोणतेही बंद पात्र असा आहे आणि त्या पात्रावर कोणतेही उपकरण जडवलेले असून किंवा अन्य जोडसामग्री जोडलेली असून वाफेचा मार्ग बंद करण्यात आलेला असताना ती पूर्णत: किंवा अंशत: दाबाखाली असतात तेव्हा त्यांचा त्यामध्ये समावेश होतो;

[८][(ग्) "मुख्य निरीक्षक", "उप मुख्य निरीक्षक" आणि "निरीक्षक" यांचा अर्थ, या अधिनियमाखाली अनुक्रमे निरीक्षक, उप मुख्य निरीक्षक आणि निरीक्षक म्हणून नेमलेली व्यक्ती असा आहे ;]

[१०][(गग्) "बचतसाधक" याचा अर्थ, वाया जाणारी उष्णता परत मिळविण्यासाठी ज्यावर पूर्णत: किंवा अंशत: धूममार्गातील वायूंची क्रिया होऊ दिली जाते असा भरणनळीचा कोणताही भाग असा आहे;

(ग्ग्ग्) "भरणनळी" याचा अर्थ, जीमधून भरणाचे पाणी थेट बॉयलरकडे जाते आणि जी त्याला अंगभूत नसते अशी पूर्णत: किंवा अंशत: दाबाखाली असलेली कोणतीही नळी किंवा तिच्याशी निगडित असलेली जोडसामग्री असा आहे;]

(घ्) "मालक" यामध्ये, बॉयलरच्या मालकाचा अभिकर्ता म्हणून त्याचा वापर करणारी कोणतीही व्यक्ती आणि बॉयलरच्या मालकाकडून तो भाड्याने घेऊन किंवा उसनवार घेऊन त्याचा वापर करणारी कोणतीही व्यक्ती यांचा समावेश आहे ;

(ङ्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांद्वारे किंवा नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

[९][(च्) "वाफनळी" याचा अर्थ, वाफ एखाद्या नळीतून मूल गतिचालकाकडे किंवा जेथे वाफेचा उपयोग होतो अशा अन्य भागाकडे किंवा दोन्हींकडे जात असून, जर—

(एक) अशा नळीमधून वाफ ज्या दाबाने जाते तो दाब वातावरणीय दाबाच्या वर दर चौरस सेंटिमीटरला ३.५ किलोग्रॅमपेक्षा अधिक असेल तर; किंवा

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी पहा, भारताचे राजपत्र, १९२३, भाग पाच, पृष्ठ २४९ आणि संयुक्त समितीच्या अहवालासाठी पहा, कित्ता, १९२३, भाग पाच, पृष्ठ १५.

२. 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे पूर्वीच्या पोटकलमाऐवजी घातले.

३. १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग ख राज्ये खेरीजकरून" याऐवजी घातले.

४. १ जानेवारी, १९२४, पहा, दिनांक ४ डिसेंबर, १९२३ ची अधिसूचना क्रमांक ए-६१, पहा, भारताचे राजपत्र, १९२३, भाग एक, पृष्ठ १६९९.

५. १९३७ चा अधिनियम ११-कलम ३ द्वारे घातले.

६. १९२९ चा अधिनियम ९-कलम २ द्वारे "अशा पात्राबाहेरील वापरासाठी" हे शब्द गाळले.

७. १९६० चा अधिनियम १८-कलम २ द्वारे "पाच गॅलन" याऐवजी घातले.

८. कित्ता ——— कलम २ द्वारे मूळ खंड (ग्) ऐवजी घातले.

९. कित्ता ——— कलम २ द्वारे मूळ खंड (च्) ऐवजी घातले.

१०. १९४९ चा अधिनियम ४०-कलम३ व अनुसूची यांद्वारे विशोधित केलेले असे, १९४७ चा अधिनियम ३४ याचे कलम २ याद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले. मूळ खंड (गग्) हा १९४३ चा अधिनियम १७-कलम २ द्वारे घातला होता.

(दोन) अशा नळीचा अंतर्व्यास २५४ मिलिमीटरपेक्षा अधिक असेल तर,

ती नळी असा आहे; आणि दोन्ही बाबतींत, वाफनळीशी निगडित असलेल्या कोणत्याही जोडसामग्रीचा त्यात समावेश आहे;]

(छ) जेव्हा जुन्याच्या बदली नवीन वापरलेला भाग किंवा जोडसामग्री मजबुतीच्या, कार्यक्षमतेच्या दृष्टीने किंवा अन्यथा जुन्या भागापेक्षा किंवा जोडसामग्रीपेक्षा उणी नसेल तेव्हा, "घडणीतील फेरबदल, भर किंवा नवीकरण" या संज्ञेमध्ये किरकोळ स्वरूपाचे कोणतेही नवीकरण किंवा प्रतिस्थापन यांचा समावेश आहे असे मानण्यात येणार नाही.

[1][भरणनळ्यांना अधिनियम लागू असणे.]

[1][२क. [कलम २ च्या खंड (च्) मध्ये जेथे "वाफ" हा शब्द वापरला आहे तो खेरीजकरून इतरत्र] या अधिनियमामध्ये वाफनळीचा किंवा वाफनळ्यांचा जो जो निर्देश आहे त्या प्रत्येक निर्देशामध्ये अनुक्रमे भरणनळीचा किंवा भरणनळ्यांचाही निर्देश समाविष्ट आहे असे मानण्यात येईल.]

[2][बचतसाधकांना अधिनियम लागू असणे.]

[2][२ख. [कलम २ चा खंड (ग्ग्ग्), [3]* * * *

* * * * * *

खेरीजकरून इतरत्र] या अधिनियमामध्ये बॉयलरचा किंवा बॉयलरांचा जो जो निर्देश आहे त्या प्रत्येक निर्देशामध्ये अनुक्रमे बचतसाधकाचा किंवा बचतसाधकांचाही निर्देश समाविष्ट आहे असे मानण्यात येईल.]

लागू होण्याची मर्यादा.

३. (१) कोणताही बॉयलर किंवा वाफनळी—

(क्) [6]'भारतीय आगबोटी अधिनियम, १८८४' (१८८४ चा ७) याच्या कलम ३ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही आगबोटीतील किंवा 'अंतर्देशीय वाफोर अधिनियम, १९१७' (१९१७ चा १) याच्या कलम २ मध्ये व्याख्या दिल्याप्रमाणे कोणत्याही वाफोरमधील असेल तर; किंवा

[7][(ख्) भूसेना, नौसेना किंवा वायुसेना यांची किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असेल तर; किंवा]

[8][(ग्) रुग्णालयांमध्ये सर्वसामान्यपणे ज्या ठेवणीचे निर्जंतूकरणयंत्र किंवा संसर्गनाशकयंत्र वापरण्यात येते त्याच्याशी संबंधित असून, बॉयलरची क्षमता [5][९१ लिटर] पेक्षा जास्त नसेल तर,]

त्या बॉयलरच्या किंवा वाफनळीच्या बाबतीत, या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(२) [9][केंद्र शासन] शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे जाहीर करू शकेल की, या अधिनियमाचे उपबंध, [10][[11][केंद्र शासनाद्वारे] किंवा कोणत्याही राज्य शासनाद्वारे] किंवा 'भारतीय रेल्वे अधिनियम, १८९०' (१८९० चा ९)-कलम (३) च्या खंड (५) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या कोणत्याही रेल्वे कंपनीद्वारे प्रशासिल्या जाणाऱ्या कोणत्याही रेल्वेचे किंवा तिच्या नियंत्रणाखाली असलेले बॉयलर किंवा वाफनळ्या अथवा त्या बॉयलरांचा किंवा वाफनळ्यांचा एखादा विनिर्दिष्ट वर्ग यांच्या बाबतीत लागू होणार नाहीत.

[12]* * * * * * *

विस्तार मर्यादित करण्याची शक्ती.

४. [13][राज्य शासनाला] शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे एखादे विनिर्दिष्ट क्षेत्र या अधिनियमाच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही विनिर्दिष्ट उपबंधांच्या प्रवर्तनातून वगळता येईल.

---

१. १९४३ चा अधिनियम १७-कलम ३ द्वारे घातले.
२. १९४७ चा अधिनियम ३४-कलम ३ द्वारे घातले.
३. १९५२ चा अधिनियम २५-कलम २ द्वारे "कलम ६—खंड (ङ्), कलम ११—खंड (ग्) आणि (घ्), कलम २९—खंड (घ्)" हा मजकूर गाळला.
४. १९६० चा अधिनियम १८-कलम ३ द्वारे "आणि कलम ३४" हा मजकूर गाळला.
५. किता ——— ४ द्वारे "वीस गॅलन" याऐवजी घातले.
६. आता पहा, 'भारतीय व्यापारी नौपरिवहन अधिनियम, १९२३' (१९२३ चा २१)-कलम २.
७. १९५१ चा अधिनियम ३८-कलम २ द्वारे पूर्वीच्या खंडाऐवजी घातले.
८. १९४२ चा अधिनियम ५-कलम २ द्वारे जादा दाखल केले.
९. 'अनुकूलन आदेश १९४८' द्वारे "सुरक्षा नियंत्रक प्राधिकारी" याऐवजी घातले.
१०. 'अनुकूलन आदेश १९३७' द्वारे "शासनाद्वारे" याऐवजी घातले.
११. 'अनुकूलन आदेश १९४८' द्वारे "फेडरल रेल्वे प्राधिकरणाद्वारे" याऐवजी घातले.
१२. 'अनुकूलन आदेश १९३७' द्वारे समाविष्ट करण्यात आलेला दुसरा परिच्छेद 'अनुकूलन आदेश, १९४८' द्वारे गाळला.
१३. 'गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिल' हा शब्दोल्लेख अनुक्रमे 'अनुकूलन आदेश, १९३७' आणि 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे वरीलप्रमाणे विशोधित केला.

[मुख्य निरीक्षक, उप मुख्य निरीक्षक व निरीक्षक.] [१]

[५. (१) राज्य शासन, त्याला योग्य वाटेल अशा व्यक्तींना या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी राज्याचे निरीक्षक म्हणून नियुक्त करू शकेल, आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली निरीक्षकांना प्रदान केलेल्या शक्तींचा वापर आणि त्यांना नेमून दिलेल्या कर्तव्यांची बजावणी प्रत्येक निरीक्षकाला कोणत्या स्थानिक सीमांमध्ये करावी लागेल ते निश्चित करू शकेल.

(२) राज्य शासन, त्याला योग्य वाटेल अशा व्यक्तींना राज्याचे उप मुख्य निरीक्षक म्हणून नियुक्त करू शकेल आणि प्रत्येक उप मुख्य निरीक्षकाला या अधिनियमाखालील आपल्या शक्तींचा वापर आणि त्याखालील आपल्या कर्तव्यांची बजावणी कोणत्या स्थानिक सीमांमध्ये करावी लागेल ते निश्चित करू शकेल.

(३) प्रत्येक उप मुख्य निरीक्षक या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली निरीक्षकांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर आणि त्यांना नेमून देण्यात आलेल्या कर्तव्यांची बजावणी करू शकेल आणि त्याशिवाय, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली मुख्य निरीक्षकाला प्रदान करण्यात आलेल्या अशा शक्ती आणि त्याला नेमून देण्यात आलेली अशी कर्तव्ये राज्य शासन उप मुख्य निरीक्षकाकडे सोपवील तेव्हा, त्यांचाही वापर व बजावणी करू शकेल.

(४) राज्य शासन एखाद्या व्यक्तीला राज्याचा मुख्य निरीक्षक म्हणून नियुक्त करील आणि ती व्यक्ती या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली मुख्य निरीक्षकाला प्रदान करण्यात आलेल्या शक्ती आणि त्याला नेमून देण्यात आलेली कर्तव्ये यांव्यतिरिक्त आणखी, उप मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक यांना प्रदान करण्यात आलेली कोणतीही शक्ती वापरू शकेल किंवा त्यांना नेमून देण्यात आलेली कर्तव्ये बजावू शकेल.

(५) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, उप मुख्य निरीक्षक आणि निरीक्षक, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर आणि त्यांना नेमून देण्यात आलेल्या कर्तव्यांची बजावणी मुख्य निरीक्षकाच्या सर्वसाधारण देखरेखीखाली आणि नियंत्रणाखाली करतील.

(६) बॉयलरांची योग्य देखभाल करणे आणि त्यांचे काम सुरक्षितपणे चालवणे यासंबंधात त्यांच्या मालकांना जो सल्ला देणे स्वतःला योग्य वाटेल तो सल्ला मुख्य निरीक्षक, उप मुख्य निरीक्षक आणि निरीक्षक हे देऊ शकतील.

(७) मुख्य निरीक्षक आणि सर्व उप मुख्य निरीक्षक आणि निरीक्षक हे 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलम २१ याच्या अर्थानुसार लोक सेवक असल्याचे मानण्यात येईल.]

नोंदणी न झालेल्या किंवा प्रमाणपत्र न मिळालेल्या बॉयलरच्या वापराला मनाई.

६. या अधिनियमामध्ये अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केले असेल ते खेरीजकरून एरव्ही, कोणताही बॉयलरचा मालक--

(क) या अधिनियमाच्या उपबंधांनुसार त्या बॉयलरची नोंदणी करण्यात आल्याखेरीज;

(ख) बॉयलरचे एका राज्यातून दुसऱ्या राज्यामध्ये स्थानांतर करण्यात आले असेल त्याबाबतीत असे स्थानांतराचे वृत्त विहित पद्धतीने कळविण्यात येईपर्यंत;

(ग) बॉयलरचा वापर प्राधिकृत करणारे प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश या अधिनियमाखाली त्या त्या वेळी अंमलात असल्याखेरीज;

(घ) अशा प्रमाणपत्रामध्ये किंवा तात्पुरत्या आदेशामध्ये नमूद करण्यात आलेल्या कमाल दाबापेक्षा जास्त दाबावर;

(ङ) जेथे राज्य शासनाचे बॉयलर हे [२][नैपुण्य किंवा सक्षमता प्रमाणपत्र] धारण करणाऱ्या व्यक्तींच्याच ताब्यात असणे आवश्यक करणारे नियम केले असतील त्याबाबतीत, बॉयलर अशा नियमांद्वारे आवश्यक केलेले प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीच्या ताब्यात असल्याखेरीज,

त्याचा वापर करणार नाही किंवा वापर करू देणार नाही :

परंतु, याद्वारे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आलेला कोणताही बॉयलर अथवा प्रमाणित करण्यात किंवा लायसन देण्यात आलेला कोणताही बॉयलर या अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आलेला किंवा, प्रकरणपरत्वे, प्रमाणित करण्यात आलेला आहे असे मानण्यात येईल.

[३]* * * * * * *

नोंदणी.

७. (१) या अधिनियमाच्या उपबंधांखाली नोंदणी न केलेल्या कोणत्याही बॉयलरच्या मालकाला बॉयलरची नोंदणी करून घेण्यासाठी निरीक्षकाकडे अर्ज करता येईल. अशा प्रत्येक अर्जासोबत विहित फी द्यावी लागेल.

(२) पोटकलम (१) खालील अर्ज मिळाल्यानंतर निरीक्षक, अर्ज मिळाल्यापासून तीस दिवसांच्या किंवा विहित करण्यात येईल त्याप्रमाणे त्यापेक्षा कमी कालावधीच्या आतील दिनांक बॉयलरच्या तपासणीसाठी नियत करील आणि अशाप्रकारे नियत केलेल्या दिनांकाबाबत किमान दहा दिवसांची नोटीस त्याच्या मालकाला देईल.

---

१. १९६० चा अधिनियम १८-कलम ५ द्वारे मूळ कलम ५ ऐवजी घातले.
२. कित्ता--कलम ६ द्वारे "सक्षमता प्रमाणपत्र" याऐवजी घातले.
३. १९३९ चा अधिनियम ३४-कलम ३ व अनुसूची दोन यांद्वारे परंतुक निरसित केले.

(३) उक्त दिनांकाला निरीक्षक हा बॉयलरचे मोजमाप आणि तपासणी करण्याचे आणि असा बॉयलर ज्या कमाल दाबावर वापरता येईल असा कोणताही कमाल दाब असल्यास, तो विहित पद्धतीने ठरवण्याचे काम सुरू करील, आणि विहित नमुन्यामध्ये तपासणीच्या निष्कर्षांचा अहवाल मुख्य निरीक्षकाकडे पाठवील.

(४) अहवाल मिळाल्यानंतर मुख्य निरीक्षक,—

(क) तत्काळ, अथवा बॉयलर किंवा त्याला संलग्न असलेली कोणतीही वाफनळी यांच्या घडणीत ज्याप्रकारे फेरबदल करणे, भर घालणे किंवा तिचे नवीकरण करणे आवश्यक आहे असे त्याला वाटेल त्याप्रकारे ते करण्यात आले आहे याची खात्री झाल्यानंतर बॉयलरची नोंदणी करून त्याला नोंदणी क्रमांक नेमून देऊ शकेल, किंवा

(ख) बॉयलरची नोंदणी करण्यास नकार देऊ शकेल :

परंतु, मुख्य निरीक्षकाने बॉयलरची नोंदणी करण्याचे नाकारले तर, तो आपला नकार, त्यामागील कारणांसह बॉयलरच्या मालकाला तत्काळ कळवील.

(५) बॉयलरची नोंदणी केल्यानंतर मुख्य निरीक्षक, त्याला योग्य वाटेल अशा व या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांनुसार असेल अशा कमाल दाबापेक्षा अधिक नाही इतक्या दाबावर जास्तीत जास्त बारा महिने इतक्या कालावधीपर्यंत बॉयलरचा वापर करण्यास प्राधिकृत करणारे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र मालकाला देण्याबाबतचे आदेश देईल :

[1][परंतु, बचतसाधकाच्या [2][किंवा जेथे उष्णतादायी माध्यम म्हणून फक्त तेल, डांबर किंवा बिटुमेन याचाच वापर करून वाफ निर्माण करण्यात येते अशा संस्करण संयंत्राला अंगभूत असलेल्या अशा अप्रज्वलित बॉयलरच्या] संबंधात या पोटकलमाखाली दिलेल्या प्रमाणपत्रान्वये जास्तीत जास्त चोवीस महिन्यांच्या कालावधीपर्यंत त्यांचा वापर प्राधिकृत करता येईल. ]

(६) निरीक्षक हा मुख्य निरीक्षकाचे आदेश बॉयलरच्या मालकाला तत्काळ कळवील आणि त्यानुसार जे प्रमाणपत्र देण्याबाबत आज्ञापिले गेले आहे असे कोणतेही प्रमाणपत्र मालकाला देईल आणि बॉयलरची नोंदणी करण्यात आली असेल त्याबाबतीत, मालक विहित कालावधीमध्ये त्यावर विहित पद्धतीने नोंदणी क्रमांक कायम स्वरूपात चिन्हित करवून घेईल.

**प्रमाणपत्राचे नूतनीकरण.**

८. (१) बॉयलरचा वापर प्राधिकृत करणारे प्रमाणपत्र —

(क) ते ज्या कालावधीसाठी दिले होते तो कालावधी संपताच; किंवा

(ख) जेव्हा बॉयलरला कोणताही अपघात होईल तेव्हा; किंवा

(ग) ज्या उभट बॉयलरचा उष्णतादायी पृष्ठभाग [3][१८·५८ चौरस मीटर] पेक्षा कमी आहे असा बॉयलर अथवा सुवाह्य किंवा वाहनोपयोगी बॉयलर सोडून अन्य बॉयलरच्या बाबतीत, तो जागेवरून हलवला जाईल तेव्हा; किंवा

(घ) जेव्हा बॉयलरच्या घडणीत कोणतीही फेरबदल करण्यात येईल, भर घालण्यात येईल किंवा नवीकरण करण्यात येईल तेव्हा; किंवा

(ङ) बॉयलरशी संलग्न असलेल्या वाफनळीच्या घडणीत कोणताही फेरबदल करण्यात आला असता किंवा भर घालण्यात आली असता किंवा नवीकरण करण्यात आले असता, एखाद्या विशिष्ट बाबतीत मुख्य निरीक्षकाने तसा निदेश दिला तर; किंवा

(च) तो बॉयलर किंवा त्याच्याशी संलग्न असलेली कोणतीही वाफनळी धोकादायक स्थितीत असल्याच्या कारणावरून त्याच्या वापराला मनाई करणारा मुख्य निरीक्षकाचा किंवा निरीक्षकाचा आदेश बॉयलरच्यामालकाला कळवण्यात आल्यावर ;

अंमलात असण्याचे बंद होईल.

(२) जेव्हा पोटकलम (१) च्या खंड (च) खाली आदेश देण्यात येईल तेव्हा, कोणत्या कारणांच्या आधारे तो आदेश देण्यात आला तेही आदेशाबरोबरच कळविण्यात येईल.

(३) जेव्हा एखादे प्रमाणपत्र अंमलात असण्याचे बंद होईल तेव्हा, बॉयलरचा मालक अर्ज करून, तो अर्जामध्ये विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे जास्तीत जास्त बारा महिन्यांच्या कालावधीकरता त्या प्रमाणपत्राचे नूतनीकरण करून मिळावे म्हणून निरीक्षकाला विनंती करू शकेल :

[4][ परंतु, बचतसाधक [5][ किंवा जेथे उष्णतादायी माध्यम म्हणून फक्त तेल, डांबर किंवा बिटुमेन याचाच वापर करून वाफ निर्माण करण्यात येते अशा संस्करण संयंत्राला अंगभूत असलेला असा अप्रज्वलित बॉयलर ] याच्याशी ते प्रमाणपत्र संबंधित असेल तेव्हा, जास्तीत जास्त चोवीस महिन्यांच्या कालावधीपर्यंत त्याचे नूतनीकरण करून मिळण्यासाठी अर्ज करता येईल.]

---

१. १९४७ चा अधिनियम ३४-कलम ४ द्वारे जादा दाखल केले.
२. १९६० चा अधिनियम १८-कलम ७ द्वारे घातले.
३. कित्ता—कलम८ द्वारे घातले.
४. कित्ता—कलम ३ द्वारे "दोनशे चौरस फूट" याऐवजी घातले.
५. १९४७ चा अधिनियम ३४—कलम ५ द्वारे जादा दाखल केले.

(४) पोटकलम (३) खालील अर्जासोबत विहित फी द्यावी लागेल आणि असा अर्ज मिळाल्यावर निरीक्षक तो मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या किंवा विहित केला जाईल अशा कमी कालावधीच्या आतला दिनांक बॉयलरच्या तपासणीसाठी निश्चित करील आणि अशा प्रकारे निश्चित केलेल्या दिनांकाबाबत किमान दहा दिवसांची नोटीस त्याच्या मालकाला देईल :

परंतु, घडणीत कोणताही फेरबदल केल्यामुळे, भर घातल्यामुळे किंवा तिचे नवीकरण केल्यामुळे प्रमाणपत्र अंमलात असण्याचे बंद झाले असेल त्याबाबतीत, मुख्य निरीक्षक कसलीही फी भरण्याबाबत माफी देऊ शकेल :

[1][परंतु आणखी असे की, बचतसाधकाच्या किंवा जेथे उष्णतादायी माध्यम म्हणून फक्त तेल, डांबर किंवा बिटुमेन याचाच वापर करून वाफ निर्माण करण्यात येते अशा संस्करण संयंत्राला अंगभूत असलेल्या अशा अप्रज्वलित बॉयलरच्या बाबतीत, त्याच्या तपासणीसाठी ठरवावयाचा दिनांक अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आतला असावा लागेल आणि मालकाला अशा निश्चित केलेल्या दिनांकाबाबत किमान तीस दिवसांची नोटीस देण्यात येईल. ]

(५) उक्त दिनांकाला निरीक्षक हा बॉयलरची विहित पद्धतीने तपासणी करील आणि जर बॉयलर आणि त्याच्याशी संलग्न असलेली वाफनळी किंवा वाफनळ्या सुस्थितीत आहेत याबाबत त्याची खात्री झाली तर, जास्तीत जास्त बारा महिन्यांच्या कालावधीपर्यंत आणि त्याला योग्य वाटेल अशा आणि या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांनुसार असेल अशा कमाल दाबापेक्षा अधिक नाही इतक्या दाबावर बॉयलरचा वापर प्राधिकृत करणारे नूतनीकृत प्रमाणपत्र देईल :

[2][परंतु, बचतसाधकाच्या [3][किंवा जेथे उष्णतादायी माध्यम म्हणून फक्त तेल, डांबर किंवा बिटुमेन याचाच वापर करून वाफ निर्माण करण्यात येते अशा संस्करण संयंत्राला अंगभूत असलेल्या अशा बॉयलरच्या] संबंधात या पोटकलमाखाली दिलेले नूतनीकृत प्रमाणपत्र जास्तीत जास्त चोवीस महिन्यांच्या कालावधीपर्यंत त्याचा वापर प्राधिकृत करू शकेल : ]

परंतु [3][आणखी] असे की, जर निरीक्षकाचा —

(क) (एक) अर्जामध्ये नमूद केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीपुरते विधिग्राह्य असणारे, किंवा

(दोन) बॉयलर ज्या कमाल दाबावर वापरता येईल तो वाढविणारे किंवा कमी करणारे,

असे कोणतेही प्रमाणपत्र देण्याचा विचार असेल तर, किंवा

(ख) बॉयलर किंवा त्याच्याशी संलग्न असलेली कोणतीही वाफनळी यांच्या घडणीत कोणताही फेरबदल करण्याचा, भर घालण्याचा किंवा नवीकरण करण्याचा आदेश देण्याचा विचार असेल तर, किंवा

(ग) तो बॉयलर वापरण्यायोग्य नाही असे मत असेल तर,

तपासणी केल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, निरीक्षक आपले मत आणि त्यामागील कारण बॉयलरच्या मालकाला लेखी कळवील, आणि त्या प्रकरणाचा अहवाल तत्काळ मुख्य निरीक्षकाकडे आदेशार्थ पाठवील.

(६) पोटकलम (५) खालील अहवाल मिळाल्यानंतर मुख्य निरीक्षक, या अधिनियमाच्या उपबंधांच्या आणि त्यांखाली केलेल्या विनियमांच्या अधीनतेने, त्याला योग्य वाटतील अशा शब्दांत व अशा काही शर्ती असल्यास, त्या शर्तींवर प्रमाणपत्राच्या नूतनीकरणाचा आदेश देऊ शकेल किंवा त्याचे नूतनीकरण करण्यास नकार देऊ शकेल :

परंतु, जर मुख्य निरीक्षकाने प्रमाणपत्राचे नूतनीकरण करण्याचे नाकारले तर, तो आपला नकार त्याबद्दलच्या कारणांसह बॉयलरच्या मालकाला तत्काळ कळवील.

(७) एखादे प्रमाणपत्र प्रचलित असताना त्या कालावधीमध्ये केव्हाही नूतनीकृत प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यास बॉयलरच्या मालकाला या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होतो असे मानले जाणार नाही.

**तात्पुरते आदेश.**

९. निरीक्षकाने कलम ७ च्या पोटकलम (३) खाली किंवा कलम ८ च्या पोटकलम (५) खाली कोणत्याही बॉयलरच्या प्रकरणाचा अहवाल मुख्य निरीक्षकाकडे पाठवला असेल अशा बाबतीत, कलम ८च्या पोटकलम (१) मधील खंड (च) खाली ज्याच्या वापरास मनाई करण्यात आली आहे अशा प्रकारचा तो बॉयलर नसेल तर, मुख्य निरीक्षकाचे आदेश मिळेपर्यंत, तो आपणांस योग्य वाटेल अशा आणि या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांनुसार असेल अशा कमाल दाबापेक्षा अधिक नाही इतक्या दाबावर बॉयलरचा वापर करण्यास बॉयलरच्या मालकाला लेखी परवानगी देणारा तात्पुरता आदेश देऊ शकेल. असा तात्पुरता आदेश,—

(क) ज्या दिनांकाला तो देण्यात आला त्या दिनांकापासून सहा महिने संपताच, किंवा

---

१. १९४७ चा अधिनियम ३४-कलम ५ द्वारे जादा दाखल करण्यात आलेल्या दुसऱ्या परंतुकाऐवजी १९६० चा अधिनियम १८-कलम ८ द्वारे हा मजकूर घातला.

२. १९४७ चा अधिनियम ३४-कलम ५ द्वारे घातले.

३. १९६० चा अधिनियम १८-कलम ८ द्वारे घातले.

(ख) मुख्य निरीक्षकाचे आदेश मिळाल्यावर, किंवा

(ग) कलम ८-पोटकलम (१)-खंड (ख), (ग), (घ), (ङ) व (च) यांमध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबतीत,

अंमलात असण्याचे बंद होईल आणि याप्रमाणे अंमलात असण्याचे बंद झाल्यावर तो परत निरीक्षकाच्या स्वाधीन करण्यात येईल.

**प्रमाणपत्र मंजूर करण्यात येईपर्यंत बॉयलरचा वापर.**

१०. (१) यात यापूर्वी काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा बॉयलरसंबंधीच्या प्रमाणपत्राचा कालावधी संपलेला असेल तेव्हा, त्याच्या मालकाने जर तो कालावधी संपण्यापूर्वी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी अर्ज केलेला असेल तर, त्या अर्जावरील आदेश देण्यात येईपर्यंत, त्याला पूर्वीच्या प्रमाणपत्रामध्ये नोंदलेल्या कमाल दाबावर बॉयलरचा वापर करण्याचा हक्क असेल.

(२) कलम ८-पोटकलम (१)-खंड (ख), (ग), (घ), (ङ) व (च) यांमध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही घटना प्रमाणपत्राचा कालावधी संपल्यानंतर घडते तेव्हा त्या बाबतीत पोटकलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे बॉयलरचा वापर प्राधिकृत होतो असे मानण्यात येणार नाही.

**प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश रद्द करणे.**

११. (क) एखादे प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश कपटपूर्वक मिळवण्यात आलेला आहे किंवा चुकीने किंवा पुरेशी तपासणी न करता देण्यात आलेला आहे असे समजण्यास पुरेसे कारण असेल तर; किंवा

(ख) ज्या बॉयलरच्या बाबतीत ते देण्यात आले असेल त्याला जर नुकसान पोहोचले असेल किंवा तो सुस्थितीत राहिलेला नसेल तर; किंवा

(ग) [1][नैपुण्य किंवा सक्षमता प्रमाणपत्रे] धारण करणाऱ्या व्यक्तींच्याच ताब्यात बॉयलर असणे हे आवश्यक करणारे नियम राज्य शासनाने केले असतील त्याबाबतीत, अशा नियमांनुसार आवश्यक असलेले प्रमाणपत्र धारण न करणाऱ्या व्यक्तींच्या ताब्यात बॉयलर असेल तर; किंवा

(घ) असे नियम करण्यात आलेले नसतील त्याबाबतीत, बॉयलरची स्थिती लक्षात घेता मुख्य निरीक्षकाच्या मते जी व्यक्ती तो बॉयलर ताब्यात ठेवण्यास सक्षम नाही अशा व्यक्तीच्या ताब्यात तो असेल तर,

निरीक्षकाच्या अहवालावरून किंवा अन्यथा मुख्य निरीक्षकाला केव्हाही कोणतेही प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश मागे घेता येईल किंवा रद्द करता येईल :

परंतु, मुख्य निरीक्षक खंड (घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणाच्या आधारे प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश मागे घेईल किंवा रद्द करील त्याबाबतीत, तो मागे घेण्याची किंवा रद्द करण्याची आपली कारणे बॉयलरच्या मालकाला लेखी सूचना देऊन कळवील, आणि ती सूचना मिळाल्यापासून तीस दिवस संपेपर्यंत तो आदेश अंमलात येणार नाही.

**बॉयलरांमध्ये फेरबदल करणे व त्यांचे नवीकरण करणे.**

१२. या अधिनियमाखाली नोंदणी केलेल्या कोणत्याही बॉयलरच्या घडणीत कोणताही फेरबदल करण्यास, भर घालण्यास किंवा त्याचे नवीकरण करण्यास मुख्य निरीक्षकाने लेखी मंजुरी दिली असल्याखेरीज असा कोणताही फेरबदल करण्यात येणार नाही, भर घालण्यात येणार नाही किंवा नवीकरण करण्यात येणार नाही.

**वाफनळ्यांमध्ये फेरबदल करणे व त्यांचे नवीकरण करणे.**

१३. या अधिनियमाखाली नोंदणी केलेल्या कोणत्याही बॉयलरच्या मालकाने बॉयलरशी संलग्न असलेल्या कोणत्याही वाफनळीच्या घडणीत कोणताही फेरबदल करण्याच्या, भर घालण्याच्या किंवा नवीकरण करण्याच्या पूर्वी त्याला आपल्या उद्देशाचे लेखी वृत्त मुख्य निरीक्षकाकडे रवाना करावे लागेल, आणि त्यासोबत, नियोजित फेरबदल, भर किंवा नवीकरण यांसंबंधी विहित असतील असे तपशील पाठवावे लागतील.

**तपासणीच्या वेळी मालकाचे कर्तव्य.**

१४. (१) बॉयलरच्या तपासणीसाठी या अधिनियमाखाली निश्चित केलेल्या दिनांकाला त्याचा मालक,—

(क) निरीक्षकाला तपासणीसाठी सर्व वाजवी सुविधा आणि त्याच्याकडून वाजवी रीत्या मागवण्यात येईल अशी सर्व माहिती उपलब्ध करण्यास;

(ख) तपासणीसाठी विहित रीतीने बॉयलर व्यवस्थित तयार व सज्ज ठेवण्यास; आणि

(ग) बॉयलरची नोंदणी करण्यासाठी अर्ज केला असेल त्याबाबतीत, विहित करण्यात आली असतील अशी आरेखने, विनिर्देश प्रमाणपत्रे आणि इतर तपशील पुरवण्यास,

बांधलेला असेल.

(२) जर वाजवी कारणाशिवाय मालकाने पोटकलम (१) च्या उपबंधांचे पालन करण्यात कसूर केली तर, निरीक्षक तपासणी करण्याचे नाकारील आणि ते प्रकरण मुख्य निरीक्षकाला कळवील, आणि विरुद्ध बाजूने पुरेसे कारण दाखवण्यात आले नाही तर, तो मालकाला कलम ७ किंवा, प्रकरणपरत्वे, कलम ८ खाली नवीन अर्ज सादर करण्यास फर्मावील, आणि कलम १० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, बॉयलरचा वापर करण्यास त्याला मनाई करू शकेल.

---

१. १९६० चा अधिनियम १८-कलम ९ द्वारे "सक्षमता प्रमाणपत्रे" याऐवजी घातले.

१५. ज्या कोणाही बॉयलरच्या मालकाकडे त्यासंबंधीचे एखादे प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश असेल तो मालक, ज्या कालावधीपुरते प्रमाणपत्र किंवा आदेश अंमलात असेल त्या कालावधीमध्ये कोणत्याही वाजवी वेळी, त्या त्या वेळी बॉयलर जेथे असेल त्या क्षेत्रावर अधिकारिता असणारा जिल्हा दंडाधिकारी, पोलीस आयुक्त किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांनी अथवा मुख्य निरीक्षकाने अथवा [1]''भारतीय कारखाने अधिनियम, १९११' (१९११ चा १२) याखाली नियुक्त केलेल्या कोणत्याही निरीक्षकाने, अथवा जिल्हा दंडाधिकारी किंवा पोलीस आयुक्त यांनी खास लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने त्याला ते प्रमाणपत्र किंवा आदेश हजर करण्यास फर्मावले असता तसे करण्यास बांधलेला असेल. प्रमाणपत्रे, इत्यादी हजर करणे.

१६. बॉयलरशी संबंधित प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश ज्या कालावधीपुरता अंमलात असेल त्या कालावधीमध्ये कोणतीही व्यक्ती त्या बॉयलरचा मालक झाली तर, पूर्वीचा मालक ते प्रमाणपत्र किंवा तो तात्पुरता आदेश त्या व्यक्तीकडे सुपूर्द करण्यास बांधलेला असेल. प्रमाणपत्रे, इत्यादींचे हस्तांतरण.

१७. बॉयलरची किंवा त्याच्याशी संलग्न असलेल्या वाफनळीची पाहाणी किंवा तपासणी करण्यासाठी अथवा या अधिनियमाचा कोणताही उपबंध किंवा त्याखाली केलेले विनियम किंवा नियम यांचे पालन करण्यात आले आहे की नाही किंवा करण्यात येत आहे की नाही हे पाहण्यासाठी निरीक्षकाला, ज्या क्षेत्रासाठी त्याची नियुक्ती करण्यात आली असेल त्याच्या मर्यादेत जेथे बॉयलरचा वापर होतो असे समजण्यास त्याला कारण आहे अशा कोणत्याही जागी किंवा इमारतीमध्ये कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करता येईल. प्रवेश करण्याची शक्ती.

१८. (१) जर कोणत्याही बॉयलरला किंवा वाफनळीला काही अपघात झाला तर, त्याच्या मालकाला किंवा त्याच्यावर ताबा असलेल्या कोणत्याही व्यक्तीला अपघात झाल्यापासून चोवीस तासांत निरीक्षकाकडे त्याचा लेखी अहवाल द्यावा लागेल. अशा प्रत्येक अहवालामध्ये अपघाताच्या स्वरूपाचे आणि त्यामुळे बॉयलरला किंवा वाफनळीला किंवा कोणत्याही व्यक्तीला जर कोणतीही इजा झाली असेल तर तिचे यथातथ्य वर्णन करावे लागेल, आणि निरीक्षकाला अपघाताचे गांभीर्य अजमावणे शक्य होण्याइतपत तो पुरेसा तपशीलवार असावा लागेल. अपघाताचा अहवाल.

(२) अपघाताचे कारण, स्वरूप किंवा व्याप्ती याविषयी निरीक्षकाकडून लेखी विचारण्यात येईल अशा प्रत्येक प्रश्नाला आपल्या यच्चयावत् माहितीप्रमाणे आणि कुवतीप्रमाणे खरीखुरी उत्तरे देण्याला प्रत्येक व्यक्ती बांधलेली असेल.

१९. (क) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्रदान केलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करताना किंवा तसे अभिप्रेत असताना काढलेला आदेश, किंवा मुख्य निरीक्षकाकडे अपील.

(ख) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली जो कोणताही आदेश काढणे किंवा प्रमाणपत्र देणे निरीक्षकास आवश्यक किंवा शक्य करण्यात आले आहे असा कोणताही आदेश काढण्यास किंवा प्रमाणपत्र देण्यास त्याने दिलेला नकार,

यामुळे आपणांस झळ पोहोचली असे समजणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, असा आदेश किंवा नकार तिला कळवण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत त्या आदेशाच्या किंवा नकाराच्या विरुद्ध मुख्य निरीक्षकाकडे अपील करता येईल.

२०. (क) बॉयलरची नोंदणी करण्यास अथवा बॉयलरसंबंधीचे प्रमाणपत्र मंजूर करण्यास किंवा त्याचे नूतनीकरण करण्यास नकार देणारा; किंवा अपील प्राधिकरणाकडे अपिले.

(ख) ज्या कालावधीकरता अर्ज केला असेल अशा संपूर्ण कालावधीपुरते विधिग्राह्य असणारे प्रमाणपत्र मंजूर करण्यास नकार देणारा; किंवा

(ग) इच्छित कमाल दाबावर बॉयलरचा वापर प्राधिकृत करणारे प्रमाणपत्र मंजूर करण्यास नकार देणारा; किंवा

(घ) प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश मागे घेणारा किंवा रद्द करणारा; किंवा

(ङ) कोणत्याही प्रमाणपत्रामध्ये विनिर्दिष्ट केलेले दाबाचे प्रमाण किंवा ज्या कालावधीसाठी असे प्रमाणपत्र मंजूर केलेले असेल तो कालावधी कमी करणारा; किंवा

(च) बॉयलर किंवा वाफनळी यांच्या घडणीत कोणताही फेरबदल करण्यास, भर घालण्यास किंवा नवीकरण करण्यास फर्माविणारा अथवा बॉयलरच्या घडणीत कोणताही फेरबदल करण्यास, भर घालण्यास किंवा तिचे नवीकरण करण्यास मंजुरी नाकारणारा

असा जो मूळचा किंवा अपील आदेश मुख्य निरीक्षकाने दिला असेल त्यामुळे आपणास झळ पोहोचली असे समजणारी कोणतीही व्यक्ती, असा आदेश तिला कळवण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत, या अधिनियमाखाली राज्य शासनाने स्थापन करावयाच्या अपील प्राधिकरणाला उद्देशून मुख्य निरीक्षकाकडे अपील दाखल करू शकेल.

---

१. आता पहा, 'कारखाने अधिनियम, १९४८' (१९४८ चा ६३).

[१] [अपील प्राधिकरणाच्या आदेशांचे पुनरीक्षण करण्याची केंद्र शासनाची शक्ती.]

[१] [२०क. (१) बॉयलर या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांशी अनुरूप नाही या कारणावरुन बॉयलरची नोंदणी न करण्याच्या किंवा त्याच्या संबंधात प्रमाणपत्र मंजूर न करण्याच्या किंवा त्याचे नवीकरण न करण्याच्या आदेशामध्ये हस्तक्षेप करण्यास कलम २० खाली नकार देणाऱ्या अपील प्राधिकरणाच्या आदेशामुळे आपणांस झळ पोचली असे समजणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, असा आदेश तिला कळवण्यात आल्यापासून दोन महिन्यांच्या आत, असे बॉयलर इतर देशांमध्ये वापरात आहेत या आधारावर अशा आदेशाच्या पुनरीक्षणासाठी केंद्र शासनाकडे अर्ज करता येईल.

(२) असा अर्ज मिळाल्यावर केंद्र शासन अपील प्राधिकरणाकडून संबद्ध कागदपत्र आणि इतर माहिती मागविल्यानंतर, त्या प्राधिकरणाचे अर्जावर कोणतेही अभिप्राय असल्यास ते विचारात घेऊन आणि स्वत:ला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे तज्ज्ञाचा सल्ला घेऊन नंतर, अर्जाच्या संबंधात केंद्र शासन त्याला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल ; आणि पुनरीक्षण अर्ज मान्य झाला तर, बॉयलरची तपासणी करताना, या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांशी ज्या कोणत्याही तफावती आढळतील त्यांबाबत कोणत्या अटींवर व शर्तींवर कार्यवाही करावयाची ते आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल.]

[२] [आदेशांची अंतिमता.]

[२] [२१. केंद्र शासनाचा कलम २०क खालील आदेश, आणि कलमे १९, २० व २०क मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीजकरून इतर बाबतींत, अपील प्राधिकरणाचा किंवा मुख्य निरीक्षकाचा किंवा उप मुख्य निरीक्षकाचा किंवा निरीक्षकाचा आदेश अंतिम असेल आणि तो कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद करता येणार नाही.]

किरकोळ दंड.

२२. जो कोणताही बॉयलरचा मालक,—

(एक) कलम ९ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे तात्पुरता आदेश परत स्वाधीन करण्यास, किंवा

(दोन) कलम १५ खाली प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश हजर करण्यास फर्माविले असता, तो त्याप्रमाणे हजर करण्यास, किंवा

(तीन) प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश कलम १६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे बॉयलरच्या नवीन मालकाकडे सुपूर्द करण्यास,

नकार देईल किंवा वाजवी सबब नसताना तसे करण्याकडे दुर्लक्ष करील तो, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

बॉयलरच्या बेकायदेशीर वापराबद्दल दंड.

२३. या अधिनियमाखाली बॉयलरच्या वापरासाठी प्रमाणपत्र किंवा तात्पुरता आदेश आवश्यक आहे अशा कोणत्याही बाबतीत, जो कोणताही बॉयलरचा मालक असे कोणतेही प्रमाणपत्र किंवा आदेश अंमलात नसताना बॉयलरचा वापर करील किंवा त्याद्वारे अनुज्ञेय असलेल्या दाबापेक्षा जास्त दाबावर बॉयलरचा वापर करील तो, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाला पात्र ठरेल, आणि असा गुन्हा चालू राहिल्यास, ज्याच्या संबंधात त्याला दोषी ठरवण्यात आले असेल त्या पहिल्या दिवसानंतर गुन्हा करण्याचा हेका चालू ठेवील त्या प्रत्येक दिवसामागे शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या अतिरिक्त द्रव्यदंडाला पात्र ठरेल.

इतर दंड.

२४. जी कोणतीही व्यक्ती,—

(क) एखाद्या बॉयलरची ती मालक असून त्याचे एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थानांतर झालेले असताना तो बॉयलर, कलम ६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे स्थानांतराचे वृत्त न कळवता, वापरील किंवा वापरण्यास परवानगी देईल; किंवा

(ख) स्वत: बॉयलरची मालक असून, बॉयलरला या अधिनियमाखाली नेमून दिलेला नोंदणी क्रमांक कलम ७ च्या पोटकलम (६) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे बॉयलरवर कायमचा चिन्हित करवून घेण्यात कसूर करील ; किंवा

(ग) जेव्हा कलम १२ अन्वये तसे आवश्यक असताना प्रथम मुख्य निरीक्षकाची मंजुरी घेतल्याखेरीज, बॉयलरच्या किंवा कलम १३ अन्वये तसे आवश्यक असताना प्रथम मुख्य निरीक्षकास माहिती दिल्याखेरीज वाफनळीच्या घडणीत कोणताही फेरबदल करील, भर घालील किंवा नवीकरण करील ; किंवा

(घ) बॉयलरला किंवा वाफनळीला अपघात झाला असता कलम १८ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे त्याचा अहवाल पाठवण्यात कसूर करील, किंवा

(ङ) या अधिनियमाखाली ज्या कमाल दाबावर बॉयलरचा वापर प्राधिकृत करण्यात आला आहे त्या दाबावर तो निष्क्रिय होईल अशाप्रकारे त्याच्या सुरक्षा झडपेमध्ये गैरफेर करील; [३] [किंवा

(च) बॉयलरचा दुसऱ्या कोणत्याही बॉयलरशी संलग्न असलेल्या कोणत्याही वाफेच्या किंवा गरम पाण्याच्या जोडनळीपासून किंवा इंधनवाहकापासून विहित पद्धतीने परिणामकारक रीत्या संबंध तोडल्याशिवाय दुसऱ्या व्यक्तीला आत जाऊ देईल,]

ती व्यक्ती पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाला पात्र ठरेल.

---

१. १९६० चा अधिनियम १८-कलम—१० द्वारे घातले.

२. कित्ता—कलम ११ द्वारे मूळ कलम २१ ऐवजी घातले.

३. कित्ता—कलम १२ द्वारे घातले.

**गैरफेर करण्याबद्दल दंड.** **नोंदणी चिन्हांमध्ये गैरफेर करण्याबद्दल दंड.**

२५. (१) जो कोणी या अधिनियमाच्या किंवा याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाच्या उपबंधांनुसार बॉयलरवर चिन्हित केलेला नोंदणी क्रमांक काढून टाकील, त्यात फेरबदल करील, तो विरूपित करील, दिसेनासा करील किंवा त्यात अन्यथा गैरफेर करील तो, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाला पात्र ठरेल.

(२) जो कोणी एखाद्या बॉयलरवर या अधिनियमाखाली किंवा याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाखाली त्याला नेमून देण्यात न आलेला नोंदणी क्रमांक चिन्हित करील तो, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाला, किंवा द्रव्यदंडाला, किंवा दोन्ही शिक्षांना पात्र ठरेल.

**खटल्यांची मुदत आणि त्यांना पूर्वमंजुरी.**

२६. या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली शिक्षापात्र केलेल्या गुन्ह्याबद्दलचा खटला गुन्हा करण्यात आल्याच्या दिनांकापासून [१] [चोवीस महिन्यांच्या] आत भरला नाही तर एरव्ही दाखल करता येणार नाही, आणि मुख्य निरीक्षकाच्या पूर्वमंजुरीशिवाय असा खटला दाखल करता येणार नाही.

**गुन्ह्याची संपरीक्षा.**

२७. या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली शिक्षापात्र केलेल्या कोणत्याही गुन्ह्याची संपरीक्षा इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी याच्यापेक्षा कनिष्ठ न्यायालयाद्वारे करण्यात येणार नाही.

[६] [**केंद्रीय बॉयलर मंडळ.**]

[६] [२७क. (१) कलम २८ द्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करण्यासाठी, 'केंद्रीय बॉयलर मंडळ' म्हणून संबोधावयाचे एक मंडळ स्थापन करण्यात येईल.

[२] [(२) ते मंडळ पुढील सदस्य मिळून बनेल, ते असे :—

(क) केंद्र शासन, संघ राज्यक्षेत्रे, रेल्वे, कोळसा उद्योग, भारतीय मानक संस्था, बॉयलर निर्मिति उद्योग, बॉयलरांचे वापरदार आणि केंद्र शासनाच्या मते मंडळावर ज्यांना प्रतिनिधित्व मिळावयास हवे असे इतर कोणतेही हितसंबंधित यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी केंद्र शासन विहित रीतीने नामनियुक्त करील इतके, अध्यक्षासहित जास्तीत जास्त पंधरा सदस्य;

(ख) (संघ राज्यक्षेत्राखेरीज इतर) प्रत्येक राज्याच्या शासनाने नामनियुक्त करावयाचा असा, बॉयलरांची पाहणी आणि तपासणी करण्याचे ज्ञान असणारा एखादा वरिष्ठ तंत्रकुशल अधिकारी.]

(३) मंडळामध्ये रिक्त होणारे कोणतेही पद, [३] * * * ते रिक्त करणाऱ्या सदस्याला ज्या प्राधिकरणाने नामनियुक्त केले असेल त्याने केलेल्या नामनियुक्तीद्वारे शक्य होईल तितक्या लवकर भरण्यात येईल.

[४] [(४) मंडळाला स्वतःची कार्यपद्धती आणि त्याने करावयाच्या कामकाजाचे चालन, सदस्यांच्या समितीची व उप समित्यांची स्थापना आणि त्यांच्याकडे मंडळाच्या कोणत्याही शक्ती आणि कर्तव्ये सोपवणे यांबाबत उपविधींद्वारे किंवा अन्यथा विनियमन करण्याची पूर्ण शक्ती असेल.]

(५) मंडळामध्ये कोणतेही पद रिक्त असले तरी, मंडळाच्या शक्ती वापरता येतील.]

**विनियम करण्याची शक्ती.**

२८. [७] [मंडळाला] [९] "गॅझेट ऑफ इंडिया" मधील अधिसूचनेद्वारे, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी या अधिनियमाशी सुसंगत असे विनियम करता येतील, ती प्रयोजने अशी :—

(क) बॉयलरची या अधिनियमाखाली नोंदणी आणि प्रमाणन करणे शक्य होण्यासाठी सामग्री, रचनाकृती आणि बांधणी यांच्या संबंधात आवश्यक असतील अशा प्रमाण शर्ती घालून देण्यासाठी;

[८] [(कक) खंड (क) खाली घालून दिलेल्या प्रमाण शर्तींशी कोणत्या परिस्थितीत, किती मर्यादेपर्यंत, आणि कोणत्या शर्तींच्या अधीनतेने तफावत ठेवण्यास परवानगी देता येईल ते विहित करण्यासाठी;]

(ख) बॉयलर किती कमाल दाबावर वापरता येईल ते निर्धारित करण्याची पद्धत विहित करण्यासाठी;

(ग) बॉयलरांची नोंदणी, त्याबद्दल [५] [आणि बॉयलर किंवा त्यांचे भाग यांची पाहणी व तपासणी करण्याबद्दल] द्यावयाची फी विहित करणे, मालकाने दाखल करावयाची आरेखने, विनिर्देश, प्रमाणपत्रे आणि तपशील, बॉयलर तपासणीसाठी तयार करण्याची पद्धत, त्यावर निरीक्षकाने द्यावयाच्या अहवालाचा नमुना, नोंदणी क्रमांक चिन्हित करण्याची पद्धत, आणि असा क्रमांक बॉयलरवर ज्या कालावधीमध्ये चिन्हित करावयाचा तो कालावधी यांबाबत विनियमन करण्यासाठी;

---

१. १९६० चा अधिनियम १८-कलम १३ द्वारे 'सहा महिने' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.
२. कित्ता—कलम १४ द्वारे मूळ पोटकलम (२) ऐवजी घातले.
३. कित्ता—कलम १४ द्वारे विवक्षित मजकूर गाळला.
४. कित्ता—कलम १४ द्वारे मूळ पोटकलम (४) ऐवजी घातले.
५. कित्ता—कलम १८ द्वारे घातले.
६. १९३७ चा अधिनियम ११-कलम ४ द्वारे घातले.
७. कित्ता—कलम ५ द्वारे 'गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिल' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.
८. कित्ता—कलम ५ द्वारे घातले.
९. "गॅझेट ऑफ इंडिया" हे शब्द बदललेले नाहीत. पहा, 'अनुकूलन आदेश, १९३७.'

(घ) बॉयलर आणि वाफनळ्या यांची पाहणी व तपासणी विनियमित करण्यासाठी आणि त्यांच्या प्रमाणपत्रांचे नमुने विहित करण्यासाठी;

(ङ) बॉयलरच्या आतल्या बाजूला काम करणाऱ्या व्यक्तींच्या सुरक्षिततेची खात्रीलायक तजवीज करण्यासाठी; आणि

(च) [1][मंडळाच्या] मते जी केवळ स्थानिक किंवा राज्य पातळीवरील महत्त्वाची बाब नाही अशा इतर कोणत्याही बाबींचा उपबंध करण्यासाठी.

[2][केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.]

[2][२८क. (१) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,—

(क) कलम २०क खाली अर्ज करताना अनुसरावयाची कार्यपद्धती आणि अशा अर्जांच्या संबंधात द्यावी लागणारी फी; आणि

(ख) कलम २७क, पोटकलम (२) च्या खंड (क) खालील सदस्यांच्या नामनियुक्तीच्या संबंधातील कोणतीही बाब,

यासंबंधी उपबंध करण्यासाठी नियम करू शकेल.

(२) पोटकलम (१) खाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा दोन क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरता सत्रासीन असताना ठेवण्यात येईल, आणि ज्या सत्रामध्ये तो याप्रमाणे ठेवण्यात आला ते किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमामध्ये कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

नियम करण्याची शक्ती.

२९. राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी या अधिनियमाशी आणि त्याखाली केलेल्या विनियमांशी सुसंगत असे नियम करू शकेल, ती प्रयोजने अशी:—

(क) मुख्य निरीक्षक [3][, उप मुख्य निरीक्षक] आणि निरीक्षक यांच्या अर्हता आणि कर्तव्ये विहित करण्यासाठी, [6]* * * * * * *

ते अनुक्रमे ज्यांना दुय्यम असतील अशी प्राधिकरणे घटित करण्यासाठी आणि अशा प्राधिकरणांनी वापरावयाच्या प्रशासनिक नियंत्रणाधिकाराच्या मर्यादा विहित करण्यासाठी;

(ख) बॉयलरांच्या स्थानांतराचे विनियमन करण्यासाठी;

(ग) या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांनुसार बॉयलरांची नोंदणी व प्रमाणन यांच्याबाबत उपबंध करण्यासाठी;

(घ) बॉयलर हा [4][नैपुण्य किंवा सक्षमता प्रमाणपत्रे] धारण करणाऱ्या व्यक्तींच्या ताब्यात असणे आवश्यक करण्यासाठी, आणि अशी प्रमाणपत्रे कोणत्या शर्तींवर देता येतील ते विहित करण्यासाठी;

(ङ) कलम ७ किंवा कलम ८ खाली निरीक्षकाने किती अवधीत बॉयलरांची तपासणी करणे आवश्यक आहे ते विहित करण्यासाठी;

[5][(च) नूतनीकृत प्रमाणपत्रे देण्याबद्दल, बॉयलर किंवा त्यांचे भाग यांची पाहणी व तपासणी करण्याबद्दल, वितळजोडसाधनांच्या चाचणीबद्दल किंवा राज्य शासनाच्या मते ज्यामध्ये वेळ व श्रम खर्ची पडतात अशा कोणत्याही गोष्टीबद्दल द्यावयाची फी विहित करण्यासाठी, आणि प्रत्येक बाबतीत अशा फीची रक्कम निर्धारित करण्याची पद्धत विहित करण्यासाठी ;]

(छ) अपघातांबाबतच्या चौकशीचे विनियमन करण्यासाठी;

(ज) कलम २० मध्ये निर्दिष्ट केलेली अपील प्राधिकरणे घटित करण्यासाठी, आणि त्यांच्या शक्ती व कार्यपद्धती निर्धारित करण्यासाठी;

(झ) या अधिनियमाखाली आकारलेली फी, खर्च आणि दंड यांच्या विनियोगाची पद्धत निर्धारित करण्यासाठी; आणि

---

१. १९३७ चा अधिनियम ११-कलम ५ द्वारे 'गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिल' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. १९६० चा अधिनियम १८-कलम १६ द्वारे घातले.

३. कित्ता—कलम १७ द्वारे घातले.

४. कित्ता—कलम १७ द्वारे "सक्षमता प्रमाणपत्रे" याऐवजी घातले.

५. कित्ता—कलम १७ द्वारे मूळ खंड (च) ऐवजी घातले.

६. 'अनुकूलन आदेश, १९३७' द्वारे "त्यांचे वेतन, भत्ते व सेवाशर्ती विनियमित करण्यासाठी" हे शब्द गाळले.

(ञ) सर्वसाधारणपणे राज्य शासनाच्या मते जी केवळ राज्यातील स्थानिक महत्त्वाची बाब आहे अशा कोणत्याही बाबीचा उपबंध करण्यासाठी.

[1]* * * * * * * * *

३०. कलम २८ किंवा कलम २९ खाली केलेला कोणताही विनियम किंवा नियम [2][याद्वारे असे निदेशित करता येईल की, असा विनियम किंवा नियम यांचे व्यतिक्रमण करणारी व्यक्ती, पहिल्यांदा केलेल्या गुन्ह्याच्या बाबतीत, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाला आणि नंतरच्या कोणत्याही गुन्ह्याच्या बाबतीत, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाला पात्र ठरेल]. **नियमभंगाबद्दल दंड.**

३१. (१) कलमे २८ आणि २९ अन्वये प्रदान केलेली विनियम आणि नियम करण्याची शक्ती ते विनियम व नियम आधी प्रकाशित करून नंतर केले पाहिजेत या शर्तीस अधीन असेल. **विनियम व नियम यांचे प्रकाशन.**

[1](२) अशा प्रकारे करण्यात आलेले विनियम व नियम अनुक्रमे "गॅझेट ऑफ इंडिया" मध्ये आणि स्थानिक **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करण्यात येतील, आणि, अशा प्रकाशनानंतर जणू काही ते या अधिनियमात अधिनियमित केलेले असावेत त्याप्रमाणे परिणामक होतील.

[3][३१क. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात केंद्र शासन स्वत:ला आवश्यक वाटतील असे निदेश राज्य शासनाला देऊ शकेल, आणि राज्य शासन अशा निदेशांचे पालन करील.] [3][**निदेश देण्याची केंद्र शासनाची शक्ती.**]

३२. या अधिनियमाखाली आकारण्यात आलेली सर्व प्रकारची फी, खर्च आणि दंड जमीन-महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य असेल. **फी, इत्यादींची वसुली.**

३३. अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून इतर बाबतीत, हा अधिनियम शासनाच्या मालकीच्या बॉयलरांना आणि वाफनळ्यांना लागू होईल. **शासनाला लागू असणे.**

३४. [5][(१) जे बॉयलर फक्त इमारतींना उष्णता देण्यासाठी किंवा गरम पाण्याचा पुरवठा करण्यासाठीच वापरण्यात येतात असे कोणतेही बॉयलर किंवा अशा कोणत्याही वर्गांपैकी किंवा अशा कोणत्याही ठेवणीचे बॉयलर यांना राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्याला योग्य वाटतील अशा शर्ती आणि निर्बंध घालून या अधिनियमाच्या प्रवर्तनापासून सूट देऊ शकेल.] **सूट.**

[4][[5][(२)] कोणत्याही आणीबाणीच्या प्रसंगी, राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे कोणतेही बॉयलर किंवा वाफनळचा किंवा बॉयलरांचा किंवा वाफनळ्यांचा कोणताही वर्ग किंवा कोणताही बॉयलर किंवा वाफनळी यांना या अधिनियमाच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उपबंधांच्या प्रवर्तनापासून सूट देऊ शकेल.

(३) बॉयलरची सामग्री, रचनाकृती किंवा बांधणी आणि देशाच्या शीघ्र औद्योगिकीकरणाची गरज लक्षात घेता तसे करणे आवश्यक आहे याबाबत राज्य शासनाची खात्री झाली तर, ते **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या व निर्बंधांच्या अधीनतेने त्या संपूर्ण राज्यातील किंवा त्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही विशिष्ट वर्गाच्या बॉयलरांना किंवा वाफनळ्यांना या अधिनियमाच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उपबंधांच्या प्रवर्तनातून वगळू शकेल.]

३५. [अधिनियमितीचे निरसन.] 'निरसन अधिनियम, १९२७' (१९२७ चा १२)-कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित

अनुसूची-[अधिनियमिती निरसित.] कित्ता-कलम २ व अनुसूची यांद्वारे निरासत.

---

१. 'अनुकूलन आदेश, १९३७' द्वारे परंतुक गाळले.

२. १९६० चा अधिनियम १८-कलम १८ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले.

३. कित्ता---कलम १९ द्वारे घातले.

४. कित्ता---कलम २० द्वारे पोटकलम (२) ऐवजी घातले.

५. १९२९ चा अधिनियम ९-कलम ३ द्वारे मूळ कलम ३४ ला त्या कलमाचे पोटकलम (२) असा नवीन क्रमांक दिला व पोटकलम (१) घातले.

६. पोटकलम (२) बदललेले नाही. पहा, 'अनुकूलन आदेश, १९३७'.

## THE INDIAN BOILERS ACT, 1923

## भारतीय बॉयलर अधिनियम, १९२३

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| allow | मान्य करणे | [S.20A (2)] |
| boiler | बॉयलर | [S. 2 (*b*)] |
| certificate of proficiency or competency | नैपुण्य किंवा सक्षमता प्रमाणपत्र | [S. 6 (*e*)] |
| class | वर्ग | [S. 34 (1)] |
| disinfector | संसर्गनाशकयंत्र | [S. 3 (1) (*c*)] |
| economiser | बचतसाधक | [S. 2 (*cc*)] |
| feed pipe | भरणनळी | [S. 2 (*ccc*)] |
| feed water | भरणाचे पाणी | [S. 2 (*ccc*)] |
| fitting | जोडसामग्री | [S. 2 (*b*)] |
| flue gases | धूममार्गातील वायू | [S. 2 (*cc*)] |
| fuel mains | इंधनवाहक | [S. 24 (*f*)] |
| heating medium | उष्णतादायी माध्यम | [S. 7 (5)-proviso] |
| material, design and construction | सामग्री, रचनाकृती आणि बांधणी | [S. 28 (*a*)] |
| mounting | जडवलेले उपकरण | [S. 2 (*b*)] |
| obtain on loan | उसनवार घेणे | [S. 2 (*d*)] |
| portable or vehicular boiler | सुवाह्य किंवा वाहनोपयोगी बॉयलर | [S. 8 (1) (*c*)] |
| prime mover | मूल गतिचालक | [S. 2(f)] |
| register number | नोंदणी क्रमांक | [S. 7 (4) (*a*)] |
| renewal | १. (as, of certificate) नूतनीकरण | [S. 8-m.n.] |
| | २. (as, of structure) नवीकरण | [S. 8 (1) (d)] |
| shut off | मार्ग बंद करणे | [S. 2 (*b*)] |
| steam-boiler | वाफजनक बॉयलर | [Preamble] |
| steam pipe | वाफनळी | [S. 2 (*f*)] |
| steamship | आगबोट | [S. 3 (1) (*a*)] |
| steam vessel | वाफोर | [S. 3 (1) (*a*)] |
| sterilizer | निर्जंतुकरणयंत्र | [S. 3 (1) (*c*)] |
| structural alteration, addition or renewal | घडणीतील फेरबदल, भर किंवा तिचे नवीकरण | [S. 2 (*g*)] |
| to the best of one's knowledge and ability | आपल्या यथामति माहितीप्रमाणे व कुवतीप्रमाणे | [S. 18 (2)] |
| true description | यथातथ्य वर्णन | [S. 18 (1)] |
| type | ठेवण | [S. 34 (1)] |
| unfired boiler | अप्रज्वलित बॉयलर | [S. 7 (5)-proviso] |
| vertical boiler | उभट बॉयलर | [S. 8 (1) (*c*)] |
| welders | वितळजोडसाधने | [S. 29 (*f*)] |

# भारतीय बॉयलर अधिनियम, १९२३

## THE INDIAN BOILERS ACT, 1923

### मराठी – इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| आगबोट | steamship | [S. 3 (1) (*a*)] |
| आपल्या यच्चयावत् माहितीप्रमाणे व कुवतीप्रमाणे | to the best of one's knowledge and ability | [S. 18 (2)] |
| इंधनवाहक | fuel mains | [S. 24 (*f*)] |
| उभट बॉयलर | vertical boiler | [S. 8 (1) (*c*)] |
| उष्णतादायी माध्यम | heating medium | [S. 7 (5)-proviso] |
| उसनवार घेणे | obtain on loan | [S. 2 (*d*)] |
| घडणीतील फेरबदल, भर किंवा तिचे नवीकरण | structural alteration, addition or renewal | [S. 2 (*g*)] |
| जडवलेले उपकरण | mounting | [S. 2 (*b*)] |
| जोडसामग्री | fitting | [S. 2 (*b*)] |
| ठेवण | type | [S. 34 (1)] |
| धूममार्गातील वायू | flue gases | [S. 2 (*cc*)] |
| नवीकरण | renewal | [S.8 (1) (d)] |
| निर्जंतूकरणयंत्र | sterilizer | [S. 3 (1) (c)] |
| नूतनीकरण | renewal | [S.8-m.n.] |
| नैपुण्य किंवा सक्षमता प्रमाणपत्र | certificate of proficiency or competency | [S. 6 (*e*)] |
| नोंदणी क्रमांक | register number | [S. 7 (4) (*a*)] |
| बचतसाधक | economiser | [S. 2 (*cc*)] |
| बॉयलर | boiler | [S. 2 (*b*)] |
| भरणनळी | feed pipe | [S. 2 (*cc*)] |
| भरणाचे पाणी | feed water | [S. 2 (*ccc*)] |
| मान्य करणे | allow | [S. 20A (2)] |
| मार्ग बंद करणे | shut off | [S. 2 (*b*)] |
| मूल गतिचालक | prime mover | [S. 2(f)] |
| यथातथ्य वर्णन | true description | [S. 18 (1)] |
| वर्ग | class | [S. 34 (1)] |
| वाफजनक बॉयलर | steam boiler | [Preamble] |
| वाफनळी | steam pipe | [S. 2 (*f*)] |
| वाफोर | steam vessel | [S. 3 (1) (*a*)] |
| वितळजोडसाधने | welders | [S. 29 (*f*)] |
| संसर्गनाशकयंत्र | disinfector | [S. 3 (1) (*c*)] |
| सामग्री, रचनाकृती आणि बांधणी | material, design and construction | [S. 28 (*a*)] |
| सुवाह्य किंवा वाहनोपयोगी बॉयलर | portable or vehicular boiler | [S. 8 (1) (*c*)] |